# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्य शासनाच्या महावितरणकडून वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(१) ४६२ (२३-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक जिल्ह्यामध्ये वीजपुरवठा खंडीत झाल्यामुळे वीज ग्राहकांच्या एकूण संख्येनुसार सन २०२३ वर्षातील माहे जुलै व ऑक्टोबर या महिन्यात सर्वसाधारण जनतेला अनेक तास अंधारात राहावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहिती घेऊन ढासळत असलेल्या वीज पुरवठ्याच्या सेवेच्या दर्जाबाबत महावितरणला जबाबदार धरुन राज्यातील महावितरणाकडून वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

तथापि, माहे जुलै व ऑक्टोबर २०२३ या कालावधीत वीज वाहिन्यांमध्ये बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित झाला होता.महावितरण कर्मचाऱ्यांकडून तसेच सूचिबध्द ठेकेदाराकडून वीज वाहिनी दुरुस्त करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला होता.
(२) वीज ग्राहकांना सुरळीत व अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीकडून मुख्यमंत्री सौर वाहिनी योजनेंतर्गत उपकेंद्र सक्षमीकरण करणे, रोहित्र क्षमतावाढ करणे, अतिरिक्त उच्चदाब रोहित्र बसविणे तसेच जिल्हा नियोजन आणि विकास परिषद (DPDC) योजनेंतर्गत नवीन वीज वाहिनी उभारणे, नवीन रोहित्र बसविणे इत्यादी कामे केली जातात. निरंतर वीज योजनेंतर्गत नवीन रोहित्र बसवणे, रोहित्र क्षमतावाढ करणे व सुधारीत वितरण क्षेत्र योजने (RDSS) अंतर्गत एबी केबल बसविणे, उच्चदाब वीज वाहिनी भूमिगत करणे, वीज वाहिनी विभाजन करणे, उच्चदाब वीज वाहिनीचे सक्षमीकरण करणे इत्यादी कामे केली जातात. तसेच नविन वीज कनेक्शन (N.S.C.) योजनेंतर्गत नवीन रोहित्र बसवणे, इत्यादी कामे केली जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मानवी हक्क आयोगाकडे सन २०२२-२३ या वर्षात २३ हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२) ६६५ (२३-०४-२०२५) ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १९०१७ ला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मानवी हक्क आयोगाकडे सन २०२२-२३ या वर्षामध्ये २३,८५० प्रकरणे प्रलंबित असल्याने सदर संख्या कमी करण्यासाठी कार्यक्षम उपायांची आवश्यकता असल्याचे आयोगाच्या २२ व्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले असल्याचे माहे, जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राज्य मानवी हक्क आयोगाचा अहवाल माहे डिसेंबर, २०२४ रोजीच्या हिवाळी विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणे प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त अहवालानुसार प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने मार्गी लागण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या सन २०२२-२३ वार्षिक अहवालात २३,८५० प्रकरणे प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आयोगाच्या आस्थापनेवरील अध्यक्ष व सदस्य यांची पदे सन २०२० पूर्वी दीर्घकाळ रिक्त होती. त्या काळात सुनावणीची गती कमी होती. रिक्त पदांवर अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या केल्यानंतर व सन २०२० मध्ये कोविड आजाराचे काळात प्रवास व उपस्थितीवरील निर्बंधामुळे सुनावणीकरीता कमी वेळ मिळाल्याने प्रकरणांची निर्गती होण्याची गती कमी झाली होती.

(४) कोविड काळातील निर्बंध संपल्यावर आयोगाच्या कार्यालयात सुनावणीत प्रत्यक्ष उपस्थित राहून कामकाजात सहभाग घेणे, याबरोबर अर्जदार, प्रतिवादी, शासकीय अधिकारी यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ONLINE, दृकश्राव्यमाध्यमाव्दारे कामकाजात सहभाग घेण्याची सुविधा उपलब्ध करुनदेण्यात आली आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंतची २२,४२३ प्रकरणे व दिनांक १/०१/२०२३ ते ३१/०३/२०२५ पर्यंत एकूण १५,५४८ प्राप्त तक्रारी अशा एकूण ३७,९७१ प्रकरणांपैकी ३१,३८० प्रकरणांची निर्गती करण्यात आलेली आहे. दिनांक ३१/०३/२०२५ अखेरपर्यंत ६५९१ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय रक्तपेढ्यांत एच.आय.व्ही. रोग निदानाकरीता न्यूक्लिक ॲसिडिटी टेस्ट राबविण्याबाबत

**(३) ८२२ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ ते २०२२ या दहा वर्षात संक्रमित रक्तामुळे १४४२ निष्पाप नागरिकांना एचआयव्हीची लागण झाल्याची बाब एका खाजगी संस्थेने माहिती अधिकारात मागविलेल्या माहितीमध्ये माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताच्या विविध प्रकारच्या तपासण्या केल्या जात असून त्यामध्ये एच.आय.व्ही. करीता एलिझा ही चाचणी केली जाते तथापि, एलिझा ही चाचणी एचआयव्ही संक्रमण ओळखण्यास पुरेशी नसून या चाचणी ऐवजी न्यूक्लिक ॲसिड टेस्ट ही अधिक प्रभावी आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यातील शासकीय रक्तपेढ्यांत मध्य प्रदेश, सिक्कीम, कर्नाटक, जम्मू-काश्मीर या राज्यांप्रमाणे सदर न्यूक्लिक ॲसिडिटी टेस्ट सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

या विभागास माहिती अधिकार अंतर्गत माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान अशा प्रकारची माहिती मागविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे नाही.

नॅट ही एलायझा (ELISA) व्यतिरिक्त एक अतिरिक्त चाचणी आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियम १९४५ नुसार नॅट (NAT) (न्युक्लिक ॲसिड टेस्ट) बंधनकारक नाही. तसेच केंद्र शासनाने देखील नॅट बंधनकारक नसल्याचे कळविले आहे.

नॅट या चाचणीमुळे विषाणु शोधण्याचा विंडो पिरीयड कमी म्हणजे ५ ते ७ दिवसांपर्यंत येतो. तथापि, सदरील चाचणी देखील परिपूर्ण नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्ताईनगर, बोदवड, सावदा (जि.जळगाव) येथील पोलीस कर्मचारी वसाहतीतील निवासस्थानाचे बांधकामाबाबत

**(४) ९०९ (२२-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, बोदवड, सावदा (जि.जळगाव) येथील पोलीस कर्मचारी वसाहतीतील निवासस्थानाची दुरावस्था झाली असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाचा प्रस्ताव अनेक वर्षापासून

प्रलंबित असल्याची बाब दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखनी (जि.भंडारा) येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयाची सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे या वसाहतीची देखभाल दुरुस्ती न झाल्याने या इमारतीला ठिकठिकाणी भेगा पडून इमारत जीर्ण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जीर्ण वसाहत इमारतीचा आडोसा व काळोखाचा आधार घेत असामाजिक तत्व व अवैध कृत्य या ठिकाणी होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पोलीस वसाहतीची तात्काळ दुरुस्ती करून पोलीस कर्मचाऱ्यांची निवासस्थाना अभावी होत असलेली गैरसोय लक्षात घेता या प्रस्तावाला मंजुरी व निधीच्या उपलब्धतेनुसार बांधकामाची कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ मर्या. मार्फत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२५) :** (१) व (२) होय.

(३) सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अवैध्य कृत्य होत नाही. तसेच लाखनी पोलीस ठाणे येथील निवासस्थान निर्लेखित करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग भंडारा यांची मान्यता देखील मिळाली आहे.

(४) शासन पत्र दिनांक ०७/०२/२०२३ अन्वये मान्यता दिलेल्या बांधकामाच्या प्राधान्यक्रम यादीत लाखनी पोलीस ठाणे, भंडारा येथे प्रशासकीय इमारत व शासकीय निवासस्थाने आणि पोलीस ठाणे मुक्ताईनगर, बोदवड, सावदा, जि.जळगांव येथे शासकीय निवासस्थाने बांधकामाचा समावेश आहे. तसेच शासन पत्र दिनांक ०८/०१/२०२४ अन्वये मान्यता दिलेल्या बांधकामाच्या प्राधान्यक्रम यादीत बोदवड पोलीस ठाणे, जळगाव येथे प्रशासकीय इमारत व शासकीय निवासस्थाने याचा समावेश करण्यात आला असून पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्त करण्यात आलेली आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरणाची थकबाकी कमी करण्याबाबत

**(५) ११०१ (२३-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीकडून राज्यात मुंबई वगळता घरगुती, वाणिज्यिक आणि कृषी पंपधारक शेतकरी अशा सुमारे पावणेतीन कोटी पेक्षाही अधिक ग्राहकांना वीजपुरवठा केला जात असून सन २०१० पूर्वी १० हजार कोटी रुपये असलेली थकबाकीची रक्कम मागील दीड दशकात सन २०२४ मध्ये रुपये ९८ हजार ८०४ कोटी इतकी झाली असल्याचे दिनांक २१ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकी ग्राहकांकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महावितरणतर्फे सुमारे ३.१६ कोटी ग्राहकांना वीज पुरवठा केला जात आहे. सदर बातमी "दैनिक सकाळ" या वृत्त पत्रात दिनांक २१/०१/२०२५ रोजी प्रकाशित झाली होती. माहे मार्च-२००९ रोजी महावितरणची (लघुदाब व उच्चदाब चालू वीज ग्राहक आणि कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या) ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रुपये १२,७२५ कोटी एवढी होती. सद्य:स्थितीत मार्च-२०२५ अखेर ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रुपये ९७,१९५ कोटी एवढी आहे. यामध्ये कृषी ग्राहकांची थकबाकी रुपये ७६,५४५ कोटी असून उर्वरित ग्राहकांची थकबाकी रुपये २०,६५० कोटी इतकी आहे.

(२) जे वीज ग्राहक वीज देयक भरणा मुदतीत करीत नाहीत अशा थकबाकीदार ग्राहकांना महावितरणद्वारे वीज देयक भरणा संबंधी पाठपुरावा केला जातो. थकबाकीदार ग्राहकांच्या भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे / तसेच call centre मार्फत वीज देयक भरणा करण्याबाबत सूचना देण्यात येतात. विद्युत अधिनियम २००३ नुसार कलम ५६ अन्वये पूर्व सुचना (नोटीस) देऊन थकबाकीदार ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत केला जातो. शासकीय पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा या ग्राहकांच्या थकीत वीज बिलांबाबत ०१८ योजना शासनाने जानेवारी २०२३ मध्ये मंजूर केली असून, या योजनेंतर्गत शासनाने रुपये ४६२३.२५ कोटी वीज बिल थकबाकीपोटी महावितरणला दिलेले आहेत. तसेच दिनांक २५/०७/२०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ७.१ एच.पी. पर्यंतच्या शेतीपंप प्राहकांना एप्रिल २०२४ पासून मोफत बीज देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ योजना राबविण्यात येत आहे. महावितरणने कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांच्या कृषी आणि सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहक वगळून) थकबाकी वसुली करीता "महावितरण अभय योजना-२०२४ ही योजना सुरु केली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लासलगाव विंचूर (जि.नाशिक) सह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर असलेले सौर पॅनल मंजुरीकरीता महावितरणकडून दिरंगाई होत असल्याबाबत

**(६) १७०७ (२३-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील लासलगाव व विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर असलेले सौर पॅनल बसविण्याकरीता खास बाब म्हणून एनओसी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महावितरणकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लासलगाव विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना देखभाल समिती लासलगाव यांनी दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास थकबाकी भरूनही महावितरणकडून ना - हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिले जात नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, महावितरण नाशिक यांना लेखी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, लासलगाव विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर असलेले सौर पॅनल बसवायला मंजुरी देण्याकरीता महावितरणकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

लासलगाव विंचूरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना देखभाल समिती, लासलगांव यांचे पत्र महावितरण कंपनीला प्राप्त झाले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ११/०१/२०२५ रोजीचे पत्र महावितरण कंपनीस प्राप्त झाले आहे. तथापि, जानेवारी- २०२५ मध्ये लासलगांव विंचूर सह १६ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची थकबाकी रुपये ४२४ लाख इतकी होती. ग्राहकाच्या मे-२०२२ ते सप्टेंबर- २०२५ च्या रुपये १०९७ लाख इतक्या थकबाकीच्या रक्कमेपोटी मे-२०२२ ते सप्टेंबर-२०२५ पर्यंत ग्राहकाने रुपये ३८६ लाख तसेच शासनाकडून प्राप्त बिलापोटी समायोजित रक्कम रुपये २७७ लाख असे एकूण रुपये ६६३ लाख प्राप्त झाले असून सद्य:स्थितीत या योजनेसाठीच्या दोन ग्राहकांची सप्टेंबर २०२५ अखेर रुपये ४३४ लाख इतकी थकबाकी आहे.
(३) सदर पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर सौर पॅनल तसेच OTS योजनेंतर्गत मंजूर रक्कम व पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा या सर्व बाबी विचारात घेऊन सौर पॅनल बसविण्याकरीता ऑनलाईन अर्जास मंजुरी दिली आहे. ग्राहकाने दिनांक ०१/०३/२०२५ रोजी सौर ऊर्जासाठी ऑनलाईन अर्ज केला असून, महावितरणकडून अंदाज पत्रकास मंजुरी देण्यात आली आहे. सौर पॅनल उभारण्याचे काम अर्जदाराने नेमलेल्या एजन्सी मार्फत पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतर महावितरणद्वारे सौर उर्जित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांचे कोटयवधी रुपयांची वीजबिले थकीत असल्याबाबत

**(७) १७९४ (२४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथील नगरपरिषद प्रशासनाकडे ३ कोटी ४९ लाख २४ हजार ७६९ रुपये रकमेचे वीज देयक थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा मुख्यालय असलेल्या इतर अनेक प्रमुख शासकीय विभागांकडे कोटयवधी रुपयांची वीज देयक थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या वीज देयकांची वसूली विलंब शुल्कासह करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

अशा आशयाची बातमी दैनिक लोकमत या वृत्त पत्रात दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी प्रकाशित झाली होती. जानेवारी २०२५ अखेर वाशिम येथील नगरपरिषद प्रशासनाकडे रुपये ३ कोटी ७१ लाख ८० हजार १८८ रकमेचे वीज देयक थकीत होते. मार्च-२०२५ अखेर रुपये ३ कोटी ७८ लाख ०२ हजार ९२१ रकमेचे वीज देयक थकीत आहे.

(२) हे खरे आहे.

वाशिम जिल्हा मुख्यालयी असलेल्या प्रमुख शासकीय विभागांकडे जानेवारी २०२५ अखेर रुपये ५८ लाख १९ हजार ७६९ रुपयांचे वीज देयक थकीत होते. मार्च-२०२५ अखेर रुपये २७ लाख ८७ हजार ६११ रकमेचे वीज देयक थकीत आहे.

(३) वीज देयक वसुली करीता महावितरण कंपनीतर्फे थकीत वीज बील ग्राहकांविरुध्द विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) अन्वये कार्यवाही करण्यात येते.

शासकीय ग्राहकांना शासनाकडून अनुदान उपलब्ध होत असते व निधी उपलब्धतेनुसार वेळोवेळी वीज देयकाचा भरणा करण्यात येतो. शासन निर्णय क्र. पूरक-२०२३/प्र.क्र.२०३/नवि-१४ दिनांक ०१/०१/२०२४ नुसार दिनांक ०६/०२/२०२४ रोजी प्राप्त झालेल्या एकूण रुपये १८६.२५ कोटी निधीपैकी रुपये ७०.२० लाख एवढी रक्कम वाशिम सार्वजनिक पाणीपुरवठा व पथदिवे ग्राहकांमध्ये समायोजित करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या महावितरणमधील कंत्राटी कामगारांच्या जोखीम व्यापक विमा पॉलिसीबाबत

**(८) २२३३ (२४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महावितरणमधील कंत्राटदारांना कार्यादेश मिळाल्यानंतर त्यांनी कंत्राटी कामगारांच्या सर्व जोखीम व्यापक विमा कंत्राटदारांनी काढणे बंधनकारक असूनही विमा कंपनी महाराष्ट्रातील असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने विमा कंपनीची कोणतीही खातरजमा न केलेली कंत्राटदारांची बिले लेखा विभागाने लेखा परिक्षित केली असल्याचे तसेच अनेक कंत्राटदारांनी सदर कंपनीचा विमा काढलेला नसून थर्ड पार्टी विमा पॉलिसी काढलेला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२५) :** (१) शासन निर्णय क्र. १३/०७/२०२२ आणि विमा संचलनालय यांचे पत्र दिनांक ११/०३/२०२४ नुसार कंत्राटी कामगारांच्या सर्व जोखीम व्यापक विमा हा, विमा संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून वा निर्देशित केलेल्या ०४ राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून काढणे बंधनकारक आहे. तसेच राष्ट्रीयकृत विमा कंपनीचे विमापत्र जारी करणारे कार्यालय स्थानिक कार्यालय असणे बंधनकारक आहे.

(२) व (३) महालेखापाल यांच्या दिनांक १७/०५/२०२४ रोजीच्या अहवालात महावितरणने विमा प्रमाणपत्रांची पडताळणी न करता कंत्राटदाराला देयके दिली आणि कामाच्या करारातून १% विमा देखिल वसूल केला नाही, असे नमूद केले आहे. परंतु, महावितरणने विमा प्रमाणपत्र पडताळणी केले आहे व जिथे कमी रकमेचा विमा घेतला गेला होता तिथे उर्वरित रक्कम रुपये ०.९७ कोटी वसूल करण्यात आली आहे. जिथे खाजगी विमा कंपनीकडून विमा घेतला गेला आहे तिथे शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १३/०७/२०२२ नुसार १% दराने कंत्राटदाराकडून रुपये २.३४ कोटी अशी एकूण रुपये ३.३१ कोटींची वसूली करुन विमा संचलनालयाकडे जमा करण्यात आलेली आहे. तसेच महावितरणने परिपत्रक क्र. औसंवि/ब/सहविमा/३३८२९, दिनांक २५/१०/२०२४ द्वारे कामगारांच्या सर्व जोखीम व्यापक विमा बाबतच्या, राज्य शासनाने जारी केलेल्या सर्व तरतूदींचे पालन करण्याबाबतच्या सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) येथे गोवंशवर्गीय जनावरांची कत्तल करुन त्यांचे मांस विक्रीसाठी नेत असल्याबाबत

**(९) २२८० (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथे गोवंशवर्गीय जनावरांची कत्तल करून त्याचे मांस विक्रीसाठी मुंबईला नेणाऱ्या दोन वाहनांना पनवेल शहर पोलिसांनी पळस्पे फाटा येथे पकडले असून या वाहनांमध्ये सुमारे ५०० ते ६०० किलो गोमांस आढळून आले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पनवेल शहर पोलीस कृत्य करणाऱ्या सर्व गुन्हेगारांना पडकण्यात यशस्वी झाले आहेत काय तसेच सदर दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड शहरात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(१०) ३९११ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात अनेक ठिकाणी जागोजागी चौकामध्ये खुले असलेल्या रोहित्रामध्ये वारंवार बिघाड होत असल्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे नागरीकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणच्या अनेक भागात फ्युज कॉल सेंटर संपर्क मोबाईल बंद असल्यामुळे नागरीकांना तक्रार करण्यास गैरसोय होत असून जिल्हाधिकारी, नांदेड यांनी महावितरणच्या बैठकीमध्ये शहरातील रोहित्रे तातडीने दुरुस्त करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत सुचना देऊनही महावितरणचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मा.जिल्हाधिकाऱ्यांच्या सुचनेचे पालन न करणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

नांदेड शहरात एकूण ४११७ रोहित्र असून माहे मे २०२५ मध्ये वादळी पावसामुळे एकूण ८१ रोहित्रांमध्ये बिघाड होऊन काही भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता.सदरची नादुरुस्त रोहित्रे गाळणी शाखेमार्फत त्वरीत बदलून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला होता.तसेच ज्या रोहित्रांच्या वितरण पेटया उघड्या आहेत. अशा वितरण पेटयाची दुरुस्ती करुन सुरक्षित करण्याचे काम करण्यात येत आहे.

नांदेड शहर भागात महावितरण कंपनीचे तीन उपविभागीय कार्यालये असून त्यामध्ये एकूण १४ शाखा कार्यालये कार्यरत आहेत. प्रत्येक शाखा कार्यालयात फ्युज कॉल सेंटर उपलब्ध असून वीजपुरवठा खंडित असल्याच्या तक्रारी व इतर तक्रारी यांची नोंद फ्यूज कॉल सेंटर क्रमांक वर देण्याची सुविधा उपलब्ध आहे. महावितरण कंपनीच्या फ्युज कॉल सेंटर मधील मोबाईल सेवा सुरु असून नागरिकांना तक्रार करण्यास कुठलाही प्रकारची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नक्षल समर्थक, फुटीरतावादी, अराजकतावादी व्यक्ती आणि संघटनांवर कारवाई होणेबाबत

**(११) ४३२९ (१८-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात घडत असलेल्या घटनांच्या अनुषंगाने शहरी भागात सक्रिय असलेली नक्षल समर्थक, फुटीरतावादी, अराजकतावादी व्यक्ती या संघटनांवर कारवाई होणे गरजेचे आहे तसेच ‘लकडगंज (नागपूर शहर) येथे इंडियन आर्मी मुर्दाबाद’ आणि ‘ऑपेरेशन सिंदूर’ बाबत निषेध करणाऱ्या संबंधित व्यक्तीविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीताबर्डी (नागपूर शहर) येथे नक्षलसमर्थक समता कला मंच नागपुर येथील अराजकतावादी लेखक विलास खरात यांच्या विरोधात अहेरी पोलीस स्टेशन (गडचिरोली) येथे गुन्हा

दाखल करण्यात आला असून तसेच पुणे (वारजे माळवाडी पोलीस स्टेशन) शहरामध्ये संशयित अराजकतावादी Revolutionary Workers' Party of India (RWPI) आणि BDS (Boycott Divestment Sanction) चळवळी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संशयित व्यक्ती व संघटनांवर कारवाई करण्याबाबत तसेच अराजकतावादी व्यक्ती, संघटनांच्या कारवाया उधळून लावणेकरीता जागरूक नागरिकांच्या सहभागातून प्रभावी यंत्रणा राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदरहू प्रकरणी, नागपूर शहर आयुक्तालयाअंतर्गत पोलीस ठाणे लकडगंज येथे अप. क्र. ३४७/२०२५ अन्वये, पोलीस स्टेशन सिताबर्डी, नागपूर शहर येथे अप. क्र. ३९६/२०२५ अन्वये, पोलीस स्टेशन अहेरी, गडचिरोली येथे अप. क्र. ३८१/२०२४ अन्वये आणि पोलीस स्टेशन वारजे माळवाडी, पुणे शहर येथे अप. क्र. २०३/२०२५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून, सदर गुन्ह्यांचा पुढील तपास सुरु आहे.
अराजकतावादी व्यक्ती, संघटना यांच्या कारवाया उधळून लावण्याकरीता महाराष्ट्र पोलीस दलातर्फे एकूण ८५ पोलीस घटकांमध्ये नक्षल सेल कार्यान्वित आहेत. महाराष्ट्रातील सर्व नक्षल सेल यांना त्यांचे स्तरावर सक्रीय नक्षल समर्थक, फुटीरतावादी, अराजकतावादी व्यक्ती आणि संघटना यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमांबाबत गोपनीय यंत्रणेद्वारे माहिती प्राप्त करून संबंधित व्यक्ती व संघटनांचे डोझीयर तयार करण्यात येत असते. तसेच सामान्य नागरिक, तरूण वर्ग, विद्यार्थी यांचे या विषयी प्रबोधन होण्याकरीता शाळा व महाविद्यालये येथे विविध शैक्षणिक, सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.
नक्षल विरोधी अभियान नागपूर येथील टेक्निकल सेल व सर्व जिल्ह्यातील नक्षल सेल व्दारे सामाजिक माध्यमांवर वेगवेगळे सोशल ॲप तयार करण्यात आले असून, त्यातून प्रबोधनपर लघुचित्रपट, लघुचित्रफिती प्रसारीत करून जनतेचे प्रबोधन करण्यात येते. तसेच वर्तमानपत्रात लेख लिहून जनजागृती करण्यात येत आहे.

---

## कुर्लोद ग्रामपंचायत हद्दीतील जांभूळपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे स्मशानभूमी नसल्याने आदिवासींची गैरसोय होत असल्याबाबत

**(१२) ४७२३ (१४-१२-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्लोद ग्रामपंचायत हद्दीतील जांभूळपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे आदिवासी बांधवांसाठी स्मशानभूमी नसल्याने पावसाळयात ताडपत्रीच्या आधारे उघड्यावरच अंत्यसंस्कार करण्यात येत असल्याची बाब दिनांक २७ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून आदिवासींच्या योजनांवर कोटयावधी रुपये निधी खर्च करण्यात येत असताना आदिवासी भागामध्ये स्मशानभूमीच्या कामांकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, उक्त कुर्लोद ग्रामपंचायत हद्दीतील जांभूळपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे तसेच इतर जिल्ह्यात आदिवासी बांधवांसाठी स्मशानभूमी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** १), २) व ३) अंशत: खरे आहे.

तथापि, पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात कुर्लोद ग्रामपंचायत अंतर्गत मौजे जांभुळपाडा हा पाडा असून सदर पाड्याकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण जनसुविधा योजनेमधून ग्रामपंचायत कुर्लोद येथे स्मशानभूमी शेड बांधकाम या कामासाठी रक्कम रुपये ५,००,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. सदर काम सध्या ग्रामपंचायतीच्या निविदास्तरावर असून सदर काम तातडीने करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच, राज्य व जिल्हा स्तरावरील विविध शासकीय योजनांच्या अटी-शर्ती व सदर कामांसाठी जागा व निधी उपलब्धतेनुसार आदिवासी भागामध्ये स्मशानभूमीची कामे करण्यात येत असतात.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील मा.उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचला खंडपीठाचा दर्जा देण्याबाबत

**(१३) ४९६९ (१४-१२-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच सुरू करण्यात आले असून माहे ऑगस्ट, २०२५ पासून कार्यरत असलेल्या सर्किट बेंचला पूर्णतः कार्यरत खंडपीठाचा दर्जा मिळण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांनी मत व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाने सदर सर्किट बेंचला खंडपीठाचा दर्जा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) व (२) कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालयाचे नियमित खंडपीठ स्थापन करण्याबाबत विधि व न्याय मंत्रालय, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## महाराष्ट्रातील दस्तऐवज परिक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) अधिपत्याखालील न्याय वैदयक शाखांना न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेत विलीनीकरण करणेबाबत

**(१४) ५२१० (१७-११-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस विभागाच्या अधिपत्याखाली न्यायवैद्यक शाखांच्या संस्कृतीवर संशोधनात्मक वातावरणापेक्षा पोलीस वातावरण आणि नोकरशाहीचा जास्त प्रभाव असून राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या सन २००० च्या मल्लिमथ समितीच्या शिफारशीनुसार गुजरात राज्यात सन २००२ साली हस्ताक्षर तज्ञ विभाग गुजरात राज्य, गुन्हे अन्वेषण विभागातून (CID) मुक्त करुन, गुजरात राज्य, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेत विलीनीकरण करण्यात आले असून गुजरातप्रमाणे महाराष्ट्र न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेत विलीनीकरण करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले अहे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतातील ३० हून अधिक राज्य व केंद्र शासित प्रदेशात हस्ताक्षर तज्ञही न्याय वैद्यक शाखा पोलीस विभागाच्या नियंत्रणातून पूर्णत: मुक्त असून, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेच्या अधिपत्याखाली परिपूर्ण व वैज्ञानिक वातावरणात विकसित होत असून महाराष्ट्रातील हस्ताक्षर तज्ञही न्याय वैद्यक शाखा गुन्हे अन्वेषण (CID) मुक्त करुन न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेत विलीनीकरण करणेबाबतचा निर्णय घेणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधी तसेच समर्थनही सामाजिक संस्था सातत्याने पाठपुरावा करित असून त्याबाबतचे आवश्यकते सर्व माहिती वेळोवेळी सादर करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दस्तऐवज परिक्षण शाखेवर राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या नियंत्रणाखाली असल्याने संशोधनावर त्याचा अनिष्ठ परिणाम होत असून त्यामुळे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिपत्याखाली न्याय वैद्यक शाखेचा गुजरातप्रमाणे महाराष्ट्रात न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेत विलीनीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०२५) :** (१), (२) व (३)

देशातील काही राज्यांमध्ये दस्तऐवज परीक्षण विभाग न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत, हे खरे आहे.

गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या दस्तऐवज परीक्षण शाखेचे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये विलिनीकरण करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## सेंट्रल उर्दू हायस्कूल, सावंतवाडी येथील मुख्याध्यापक यांच्याविरुध्द दाखल गुन्ह्याबाबत माहिती मागविण्याबाबत

**(१५) ५३११ (१४-१२-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट्रल उर्दू हायस्कूल, सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील मुख्याध्यापक इक्बाल दस्तगीर मुलाणी यांच्याविरुध्द गु. र. क्र. १३८/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (POCSO Act) कलम ८ आणि अल्पवयीन मुलांच्या संरक्षण अधिनियम, २०१५ चे कलम ७५ अन्वये दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सावंतवाडी पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांनी सावंतवाडी मर्कझी जमात, मुंबई येथील विश्वस्तांना पत्र क्रमांक ५९२०/२०२५, दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणास अनुसरून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी महिला पोलीस उपनिरीक्षक, सावंतवाडी यांना पत्र क्रमांक सिंजिप/शिक्षण/माध्य/आ-४/वि.चौ.मा/१०९२/२०२५, दिनांक ०३/०९/२०२५ रोजी पाठवून, सदर गुन्ह्याची FIR ची प्रत, वापरलेली कलमे, तपासाची सद्य:स्थिती, अटक व कारावासाचा कालावधी व जामीन मंजुरीचे दस्तावेज मागवले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गुन्हाबाबत सावंतवाडी पोलिसांनी सिंधुदुर्ग येथील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना माहिती दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१), (२) व (३) खरे आहे.

सदर प्रकरणी आरोपीविरुध्द सावंतवाडी पोलीस ठाणे गु. र. क्र. १३८/२०२५, भा. न्या.सं., २०२३ चे कलम ११५(२), ११८(१) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम,२०१२ कलम ८ आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ७५ अन्वये दिनांक २४/०७/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच, आरोपीविरुध्द मा.विशेष न्यायालय, सिंधुदूर्ग ओरोस येथे दिनांक ०४/०९/२०२५ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) खरे नाही.

सावंतवाडी पोलीस स्टेशनच्या दिनांक ०४/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये गुन्ह्यासंबंधित माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओझर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण व संरक्षण भिंतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ५३१२ (१४-१२-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे निर्मलग्रुप ग्रामपंचायत कार्यालय ते शौकत टोले चौकापर्यंत रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण व ग्रामपंचायत कार्यालय ते ओझर पूल पर्यंत लागून असलेल्या वहाडला संरक्षण भिंतीचे बांधकाम झालेले नसून शासनाने राजापूर तालुक्याकरीता सन २०२३-२४ या आर्थिक

वर्षासाठी एकूण १४९.०० लक्ष रुपये व सन २०२४-२५ याआर्थिक वर्षासाठी एकूण ३६६.०० लक्ष रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओझर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटचे काम व संरक्षण भिंतीचे बांधकाम अद्याप सुरू करण्यात आलेली नसून सदरहू कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. राजापूर तालुक्याकरीता सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी जनसुविधा व नागरी सुविधा योजनेतर्गंत विविध कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, ओझर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटचे काम व संरक्षण भिंतीचे बांधकामास मान्यता दिलेली नाही. याप्रकरणी राज्य व जिल्हा स्तरावरील विविध योजनेच्या अटी/शर्तीची पूर्तता, निधी उपलब्धता या बाबींचा विचार करून पुढील कार्यवाही शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जऊळके खुर्द (बोऱ्हाडे)(ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामीण रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(१७) ५४७४ (२२-१२-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जऊळके खुर्द (बोऱ्हाडे)(ता.खेड, जि.पुणे) या गावातील खारदरा वस्ती डांबरीकरण करण्याकरीता तेथील ग्रामपंचायतीने ठराव केला असून सदर ठरावास मान्यता मिळण्याकरीता येथील लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १५ऑक्टोबर, २०२५ रोजी लेखी निवेदन दिले असून जऊळके खुर्द (बोऱ्हाडे) येथील सरपंचानी देखिल शासनाकडे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) खरे आहे.
मौजे जऊळके खुर्द ते खारदरा हा रस्ता सन २००१-२०२१ या रस्ते विकास आराखड्यात समाविष्ठ नसुन सदर रस्ता हा योजनाबाह्य आहे. सदर ५०० मी. रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रुपये १५ लक्ष मंजूरी मिळण्याबाबत ग्रामपंचायत जऊळके खु. ता.खेड यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक ३/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि, सदर रस्त्याची मागणी केलेल्या शेतकऱ्यांचे बक्षीसपत्र, दानपत्र किंवा समंतीपत्र प्राप्त न झाल्याने पुढील कार्यवाही झालेली नाही. शेतकऱ्यांची संमती मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निंबोली (शेंडे) (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील निंबोली ते सर्कसपूर ह्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(१८) ५५३५ (२२-१२-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा निंबोली (शेंडे)(ता.आर्वी, जि.वर्धा) येथील निंबोली ते सर्कसपूर ह्या पुनर्वसीत गावतील ३ कि.मी रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतचे निवेदन मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निवेदनानुसार रस्त्याचे डांबरीकरण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) निंबोली शेंडे जुने (स्थलांतरीत झालेले गाव) येथील शेतीकरीता वहिवाटीस रस्त्याची अडचण असल्यामुळे येथील २ किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण करून मिळण्याबाबतचे निवेदन जिल्हा परिषद, वर्धा कार्यालयास प्राप्त झाले होते. तथापि, निंबोली शेंडे हे गाव मौजा दौलतपूर येथे पुनर्वसित करण्यात आले असल्याने व निंबोली शेंडे जुने (स्थलांतरित झालेले गाव) या ठिकाणी लोकवस्ती नसल्यामुळे निंबोली शेंडे ते सर्कसपूर हा रस्ता नवीन रस्ते विकास आराखड्यात रस्ते दर्जान्नत करण्याबाबतचा शासन निर्णय क्र. जिपर-२०२३/प्र.क्र.०१/बांधकाम-५, दिनांक ०४ डिसेंबर, २०२३ मधील नमूद निकषांची पूर्तता करीत नसल्यामुळे दर्जोन्नत करणे शक्य नाही.

तरी, शासन निर्णयामध्ये नमूद निकषांची पूर्तता, योजनेच्या अटी- शर्ती व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही शक्य आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) येथील आदिवासी समाजातील १४ वर्षाच्या मुलीची लग्नासाठी विक्री केल्याबाबत

**(१९) ५६१५ (१७-११-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील आदिवासी समाजातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला ५० हजार रुपयांना तीन वर्षांपूर्वी विकत घेऊन तिच्यासोबत जबरदस्ती लग्न करण्याचा अमानुष प्रकार माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलगी अल्पवयीन असल्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी पीडित मुलीच्या आधार कार्ड मध्ये बनावट नोंदणी करून जन्मतारीख बदलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने पीडित मुलीची विक्री करणारे दलाल व मध्यस्थी यांच्यावर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२५) :** (१) व (२) खरे आहे.
(३) सदर प्रकरणी वाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३९४/२०२५ भा.दं.वि.सं. कलम ३७६ (२)(N), ३७०, ४६८, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ चे सुधारणा २०१५ चे कलम ३ (१)(R)(S), ३(१)(w)(i)(ii), ३(२)(Va), ३(२)(V) सह बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ चे कलम ९, १०, १२ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८ प्रमाणे दिनांक ०२/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. उक्त गुन्हयाचे तपासामध्ये पीडित मुलीशी लग्न करणारा आरोपी व लग्नकार्यात मध्यस्थी करणारा दलाल यांना अटक करण्यात आली असून सदर आरोपी सद्य:स्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला तांत्रिक सहकार्य व मार्गदर्शन करणारे जागतिक आरोग्य संघटनेचे युनिट बंद होणार असल्याबाबत

**(२०) ५७५६ (१४-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार विविध साथरोगांचे नियंत्रण व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व लसीकरण मोहिमांवर मॉनेटरींग (निरिक्षण) करण्याचे काम जागतिक आरोग्य संघटनेचे युनिट करत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रिय आरोग्य मंत्रालय आणि जागतिक आरोग्य संघटनेमध्ये झालेल्या करारातील धोरणात्मक बदलांमुळे राज्यातील कोल्हापूर, कोल्हापूर महानगरपालिका, रत्नागिरी, सांगली, मिरज, सिंधूदुर्ग, अकोला, अकोला महानगरपालिका, अमरावती, वर्धा, अमरावती महानगरपालिका, वाशिम, यवतमाळ आणि मालेगाव येथील १४ युनिट्स बंद करण्याचा निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी वा त्यादरम्यान झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर युनिट्स बंद झाल्यास शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे काय, असल्यास तिचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२४-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

साथरोगांपैकी लसीकरणाद्वारे टाळता येणाऱ्या आजारांचा प्रतिबंध आरोग्य संस्था आणि आरोग्य अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत नियमित लसीकरण कार्यक्रम, विविध लसीकरण मोहिमा यांचेद्वारे प्राधान्याने केले जाते. राज्यस्तरीय, जिल्हा, मनपा, तालुका स्तरीय अधिकारी हे पर्यवेक्षण आणि देखरेख यांचे काम पाहतात. यासाठी जागतिक आरोग्य संघटनेचे सहकार्य लाभते.

(२) हे अंशत: खरे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अकोला युनिट, मालेगाव युनिट व गोवा युनिट या ३ युनिट मधील राज्यातील १४ जिल्हे/मनपा येथील जागतिक आरोग्य संघटनेचे सर्वेलन्स वैद्यकीय अधिकारी यांची कार्यालये दिनांक ३१/०८/२०२५ पासून बंद झालेली आहेत.

(३) प्रशिक्षण सल्लागार, जागतिक आरोग्य संघटना, पुणे यांचेकडून प्राप्त ई-मेल दिनांक ०४/०६/२०२५ व केंद्र शासनाचे पत्र दिनांक २०/०८/२०२५ नुसार, जागतिक आरोग्य संघटनेमार्फत खालील एकूण १४ जिल्हे/मनपा येथील जागतिक आरोग्य संघटनेचे सर्वेलन्स वैद्यकीय अधिकारी यांची कार्यालये दिनांक ३१/०८/२०२५ पासून बंद झालेली आहेत.

• अकोला युनिट अंतर्गत अकोला, अमरावती, वर्धा, वाशिम, यवतमाळ जिल्हा व अकोला, अमरावती महानगरपालिका

• मालेगाव युनिट अंतर्गत मालेगाव महानगरपालिका

• गोवा युनिट अंतर्गत कोल्हापुर, रत्नागिरी, सांगली व सिंधुदुर्ग जिल्हा व कोल्हापुर, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

उपरोक्त जिल्हे/मनपा येथील लसींद्वारे टाळता येणाऱ्या आजारांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, सर्वेक्षण, क्षेत्रिय उपाययोजना व अहवाल देणे इ. बाबतची जबाबदारी ही राज्य आरोग्य यंत्रणा तसेच, संबंधित जिल्हा आरोग्य यंत्रणेकडे (एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम) आहे. संबंधित सर्व जिल्हे व मनपा येथील अधिकारी/कर्मचारी यांचे यासंदर्भात प्रशिक्षण दिनांक ३१ जुलै ते ०१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.